## तू इथे आहेस ना?

तू इथे आहेस ना?
माझा सगळा दिवस जातो वाया निरर्थक सांसारिक कामांत,
त्याच्या खाली तर तू गाडला गेला नाहीस ना?
आहेस ना इथे?
फिरायला जाताना रोज तर तू माझ्या सोबत असेस?
आता मात्र मला लाल चुटूक कार्डीनलच दिसतो.
बसलेला असतो वठलेल्या झाडावर एकटाच झुलत..
मग आतां तू कुठे एकटाच भटकतोयस ?
का तू पण असाच माझ्या मनात गोठून गेलायस?
येतोयस ना माझ्या सोबतीला?

**- ज्योती जोशी**